जा.क्र. ४६३०/२१
२८.९.२०२१

# जाहीर नोटीस

## जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद.

**विषय** —किर्लोस्कर कंपनीचे आठ डीईजी ६५००—२ जनरेटरचे देखभाल व दुरुस्ती करणे बाबत..

या जाहीर नोटीसव्दारे जनरेटर दुरुस्तीधारक यांना कळविण्यांत येते की, जिल्हा न्यायालय ,उस्मानाबाद व अधिपत्याखालील न्यायालयाचे उस्मानाबाद/उमरगा/ लोहारा/ तुळजापुर/भूम/परंडा/वाशी/कळंब न्यायालयातील किर्लोस्कर कंपनीचे आठ ०८ डीईजी ६५००—२ जनरेटरची वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे बाबत.

त्याकरिता या नोटीसव्दारे सर्व किर्लोस्कर डीईजी ६५००—२ जनरेटर दुरुस्तीधारकांना सुचित करण्यांत येते की, वर नमुद केल्याप्रमाणे ई—कोर्टअंतर्गत प्राप्त झालेले किर्लोस्कर डीईजी ६५००—२ जनरेटरची वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणेसाठी जे दुरुस्तीधारक इच्छुक असतील त्यांनी दरपत्रके / निविदा खालील अटी व शर्तीस अधीन राहुन सदर निविदा नोटीस जिल्हा न्यायालयाच्या संकेत स्थळावर व नोटीस बोर्डावर प्रसिध्द झालेपासुन०७ दिवसाचे आंत, म्हणजेच दिनांक २८.०९.२०२१ पासुन दिनांक ०४.१०.२०२१ सायंकाळी ५.३० वाजेपर्यन्त प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद यांचे नांवे बंद लखोटयात समक्ष अथवा टपालाव्दारे पोहोचतील या बेताने पाठवावेत.

## दरपत्रकाबाबत अटी व शर्ती

०१. दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशिलासह तारखेसहीत मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद यांचे नांवे असावे.

०२. दरपत्रकाचा बंद लखोटा मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश,उस्मानाबाद यांचे नांवे पत्ता लिहुन पाठवावा.

०३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेपर्यन्तच आलेली दरपत्रके विचारात घेतले जातील.

०४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्याचे असेल त्याची दरपत्रके विचारात घेण्यात येतील, दरपत्रकामध्ये खाडाखोड करण्यांत येवु नये.

०५. दुरुस्तीसाठी असणा—या जनरेटरची दुरुस्ती चांगल्या प्रकारे व दिलेल्या वेळेत पुर्ण करणे बंधनकारक राहील.

०६. दरपत्रके नाकारण्याचा पुर्णतः अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब,उस्मानाबाद यांचा राहील.

आज दिनांक २८ सप्टेबर, २०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

28/9/2021

(श्रीमती एन.एच.मखरे)
जिल्हा न्यायाधीश,—२, उस्मानाबाद.